# जिल्हा निवड समिती, हिंगोली

## थेट मुलाखती

जिल्हा निवड समिती, हिंगोली अंतर्गत सार्वजनीक आरोग्य विभागा अंतर्गत आरोग्य संस्थेमध्ये महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ या पदावर कंत्राटी पध्दतीने एम.बी.बी.एस.,व विशेषज्ञ (पदव्युत्तर पदवी/पदविका) यांची रिक्त पदे कत्राटी पध्दतीने थेट मुलाखती द्वारे भरण्यासाठी जाहिरात 2019-20

| अ.क्रं. | पदाचे नांव (कार्यक्रम) | रिक्त पदे | शैक्षणीक अर्हता | एकत्र मानधन प्रति माह |
|---|---|---|---|---|
| 01 | वैद्यकीय अधिकारी गट-अ या पदावर कंत्राटी एम.बी.बी.एस. वैद्यकीय अधिकारी | 10 | एम.बी.बी.एस. | 55000/- प्रति माह |
| | | | एम.बी.बी.एस.पदव्युत्तर पदवि/पदविका | 65000/- प्रति माह |

अटि व शर्ती :-

1. सदर रिक्त पदभरतीच्या थेट मुलाखती दिनांक 09/09/2019 रोजी सकाळी 11.00 वा. जिल्हा प्रशिक्षण केंद्र, जुना दवाखाना, तोफखाना, हिंगोली येथे ठेवण्यात आल्या आहेत.
2. तात्पुरती नियुक्ती दिलेल्या कंत्राटी वैद्यकीय अधिकारी असल्यानें त्यांना शासनाने ठरवुन दिलेल्या नियमा प्रमाणे दिनांक 09/09/2019 रोजी 38 वर्षापेक्षा जास्त नसावे- मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत नियमा प्रमाणे शिथीलक्षम.
3. मुलाखतीस उपस्थित राहत असतांना सोबत विशेषज्ञ, वैद्यकीय अधिकारी व तत्सम पदाची शैक्षणीक अर्हते बाबत नोंदणी प्रमाणपत्र/तत्सम कौन्सील चे रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र दाखविणे बंधनकारक राहिल. त्या शिवाय उमेदवार पात्र होणार नाही.
4. सदर कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात असल्याने त्यांना नियमीत वैद्यकीय अधिका-यांसारखे म.ना.से. निवृत्ती वेतन, म.ना.से. रजा, सेवा जेष्ठता नियम लागू राहणार नाहीत. तसेच ते विमा योजना वार्षीक वेतन वाढ, भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणतेही सेवा विषयक इतर लाभ मिळण्यास पात्र राहणार नाहीत.
5. नियुक्ती आदेश प्राप्त झाल्या पासुन 15 दिवसाच्या आत पदस्थापनेच्या ठिकाणी रुजु होवुन अहवाल सर्व संबंधितांना सादर करावा.
6. सदर कंत्राटी नियुक्ती केवळ निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात असल्याने त्यांना सदर पदावर कायम करण्यात येणार नाही व त्या पदावर त्याचा धारणाधिकार असणार नाही.
7. केवळ तात्पुरती नियुक्ती दिलेल्या उमेदवारांची भविष्यात विहित मार्गाने नियमीत पदावर नियुक्ती झाल्यास सदरची तात्पुरती सेवा त्या नियमीत सेवेस जोडुन दिली जाणार नाही.
8. केवळ निव्वळ तात्पुरती व कंत्राटी नियुक्ती दिलेल्या उमेदवाराची म.ना.से. (निवृत्ती वेतन) नियम 1982 मधिल नुसार अर्हताकारी सेवा म्हणुन गणण्यात येणार नाही.

Scanned by CamScanner

9. सदर कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांनी सेवेत असतांना मुख्यालयास न राहिल्याचे निदर्शनास आल्यास अथवा कामावर गैरहजर असल्यास त्यांच्या सेवा तात्काळ समाप्त करण्यात येतील व त्यांना पुन्हा नियुक्ती देण्यात येणार नाही.
10. सदर कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांना महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम 1979 मधिल तरतूदि लागू होतील.
11. सदर कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांना सेवा काळात सेवामुक्त व्हायचे असल्यास त्यांना एक महिण्याची नोटीस किंवा एक महिण्याचे वेतन भरुन कार्यमुक्त होता येईल.
12. सदर आरोग्य संस्थेत नियमीत वैद्यकीय अधिकारी यांची पदस्थापना झाल्यास सदर कंत्राटी पदावरची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.
13. सदर कंत्राटी पदावरील नियुक्ती ही केवळ 11 महिण्याच्या कालावधीसाठी असुन यापुढे आपणास पुनर्नियुक्तीच्या पुढील कालावधीसाठी हक्क राहणार नाही.
14. जाहिरातीत नमुद पदांची संख्या व मानधन कमी अथवा जास्त होऊ शकतात तसेच निवड प्रक्रिया संबंधी कोणताही निर्णय घेण्याचे सर्व अधिकार निवड समितीने राखुन ठेवण्यात आलेले आहेत. निवड झालेल्या कोणत्याही उमेदवारांची नियुक्ती सेवा कालावधी रद्द करण्याचा अथवा चालु ठेवण्याचा अंतिम अधिकार निवड समिती अध्यक्ष यांचेकडे राखुन ठेवला आहे.

जिल्हा शल्य चिकित्सक तथा सदस्य
सचिव जिल्हा निवड समिती हिंगोली

Scanned by CamScanner